राज्यातील कांदा धोरण ठरविणे व विविध उपाययोजना सुचविण्यासंदर्भात गठित श्री.पाशा पटेल अध्यक्ष, राज्य कृषि मूल्य आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली समितीस मुदतवाढ देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक:- सपस-२०२४/प्र.क्र.६७/२४-स**
**मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२**
दिनांक :-१० जुलै, २०२६

**वाचा:- १. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय दिनांक १२ जून, २०२५**
**२.श्री.पाशा पटेल, अध्यक्ष, राज्य कृषि मुल्य आयोग यांचे दिनांक ०७.०७.२०२६ रोजीचे पत्र**

**प्रस्तावना:-**

कांदा उत्पादनात राज्य अग्रेसर असूनही, महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. सदर आव्हानांवर उपाययोजना करण्यासाठी, किंमत स्थिरीकरण, साठवणूक विस्तार, निर्यात प्रोत्साहन, बाजार सुधारणा आणि शेतकरी कल्याण उपायांवर लक्ष केंद्रित करणारे सर्वसमावेशक कांदा धोरण ठरविण्यासाठी उपरोक्त वाचा मधील शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली आहे.

कांदा पिकाचा सखोल अभ्यास, विविध संबंधित घटकांशी चर्चा, माहिती संकलन व विश्लेषणाची प्रक्रिया यांकरिता आवश्यक असलेला कालावधी विचारात घेता सदर कांदा धोरण समितीस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

कांदा धोरण ठरविणे व विविध उपाययोजना सुचविणे या प्रयोजनासाठी श्री.पाशा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली उपनिर्दिष्ट १ अन्वये गठीत समितीस संदर्भीय क्रमांक २ अन्वये करण्यात आलेल्या विनंतीनुसार १४ ऑगस्ट, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

०२. संदर्भीय क्रमांक १ मध्ये नमूद शासन निर्णयातील सर्व बाबी या शासन निर्णयास लागू राहतील.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०७१०१२५२४६७२०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ANIROODHA SURYAKANT DESHPANDE
Date: 2026.07.10 12:53:38 +05'30'

**( अनिरुध्द सू.देशपांडे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) प्रधान सचिव ( सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव
४) श्री.पाशा पटेल ,अध्यक्ष, राज्य कृषि मूल्य आयोग, महाराष्ट्र राज्य

५)	पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
६)	कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य पणन मंडळ, पुणे
७)	कृषी संचालक, कृषी आयुक्तालय, पुणे
८)	सह सचिव/उप सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
९)	सह सचिव/उप सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१०)	निवडनस्ती २४-स